# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०


**परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1528
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 10 DEC 2021

## परिपत्रक क्रमांक

**संदर्भ :-**१) प्रस्तुत विद्यापीठाचे परीपत्रक क्र.५९/२०२१, जा.क्र.पुअहोसोविसो/पवमुमं/१५१४ दिनांक ०४/१२/२०२१.

२) प्रस्तुत विद्यापीठाचे परीपत्रक क्र.५८/२०२१, जा.क्र.पुअहोसोविसो/पवमुमं/ वेळापत्रक/२०२१/१५१३ दिनांक ०३/१२/२०२१

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य /प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकानुसार Internal Marks / Viva/ Practical/ Dissertation परीक्षेचे आयोजन करुन ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून गुण प्रस्तुत विद्यापीठास पाठविणेबाबतच्या दिनांक कळविण्यात आल्या होत्या.

वर नमुद केलेल्या Internal Marks / Viva/ Practical/ Dissertation परीक्षा आयोजित करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कोविड - १९ चा प्रादुर्भाव होऊ नये याबाबतची दक्षता घेणे आवश्यक असून मा. जिल्हाधिकारी, सोलापूर व मा. आयुक्त, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर त्याचप्रमाणे राज्य शासनाने निर्गमित केलेल्या वारांवार निर्देशाचे पालन करणेच्या सूचना संदर्भ क्र. २ येथील परीपत्रकान्वये आपणास देण्यात आल्या असून त्यांचे तंतोतत पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल, याची नोंद घ्यावी.

सदरील संदर्भ क्रमांक २ येथील परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या कोविड - १९ च्या संदर्भातील नियमांचे काटेकोरपणे पालन करून Internal Marks / Viva/ Practical/ Dissertation परीक्षेचे आयोजन करण्याची संपुर्ण जबाबदारी ज्या त्या महाविद्यालयाची /संकुलाची राहणार असून संदर्भ क्रमांक १ येथील परिपत्रकान्वये ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून Internal Marks / Viva/ Practical/ Dissertation चे गुण पाठविण्याबाबत आपणास कळविलेल्या दिनांकाचा विचार न करता सदरील परीक्षेचे गुण हे विशेष परीक्षा व ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२१ च्या सत्रातील दोन परीक्षेचे गुण सदरील परीक्षा सुरु होण्यापुर्वी दोन दिवस अगोदर प्रस्तुत विद्यापीठास ऑनलाईन प्रणालीव्दारे पाठविण्याची योगयती कार्यवाही पुर्ण करण्याबाबत याव्दारे आपणास कळविण्यात येत आहे.

( डॉ शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्राचार्य, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/ सर्व संकुलाचे संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२) प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील संगणक विभाग,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर